

# जीवनाला लाभलेली नवी दिशा

## (भाग १)

उज्जैनला आशाताई फडके व मी आगगाडीत बसलो. दोघंही एकमेकांचे अनुभव सांगत होतो. त्यांचे अनुभव ऐकून मलाही आश्चर्य वाटलं. मी एक पुरुष होतो. पण आशाताई स्त्री असून एकट्या कीर्तनं करीत फिरत होत्या. भोपाळला बदललेली गाडी सकाळी ग्वाल्हेरला आली. मी खाली उतरलो. आशाताई पुढं दिल्लीला निघून गेल्या.

बॅग, वळकटी घेऊन मी स्टेशनबाहेर आलो. रामभाऊ गुळवणींचा पत्ता जवळ होता. टांगेवाल्याला पत्ता सांगितला. त्यानं सरळ त्यांच्या घरी आणून सोडलं. मला पाहून रामभाऊंना आनंद झाला. रामभाऊंचं घर मला परकं वाटलंच नाही. जवळजवळ महिनाभर मी त्यांच्या घरी होतो. रामभाऊ, त्यांच्या पत्नी आणि दोन मुलं एवढा त्यांचा संसार. रामभाऊंच्या पत्नीनंही मला त्यांचं घर परकं वाटू दिलं नाही.

रामभाऊ गुळवणी ग्वाल्हेरचे दरबारगवई होते. प्रसिद्ध गवई श्री. कृष्णराव पंडित आणि श्री. राजाभय्या पूछवाले हेही त्या वेळी दरबारगवई होते. राजाभय्या पूछवाले यांची आणि रामभाऊंची विशेष मैत्री होती. अनेकदा सकाळी ते गप्पा मारायला त्यांच्याकडे येत. त्यांच्या गप्पांत निरनिराळ्या चिजांचा उल्लेख होई. चिजा म्हटल्या जात. रागांच्या निरनिराळ्या प्रकारांविषयी चर्चा होई. हे सगळं मी लक्ष देऊन ऐकत बसे. त्या महिनाभरात राजाभय्यांनी अनेक वेळा माझ्याकडून गाऊन घेतलं. मी पाध्येबुवांचा शिष्य आहे, हे रामभाऊंनी त्यांना पहिल्याच दिवशी सांगितलं होतं. एवढ्या मोठ्या गायकाचा शिष्य म्हणून माझं गाणं ते कौतुकानं ऐकत. कृष्णराव पंडितांचं गाणंही मला दोन-तीन वेळा ऐकायला मिळालं. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांनी माझी ओळख ठेवली होती.

मुंबईला डॉ. भाजेकरांच्या घरी मी राहात असताना १९३१ किंवा ३२ साली श्री. कृष्णराव पंडितांचं गाणं त्यांच्या घरी झालं होतं. त्यांचा एक लहान मुलगा माझ्याच

वयाचा, त्यांच्याबरोबर होता. तोही छान तयारीनं गात असे. माझंही गाणं डॉ. भाजेकरांनी त्या वेळी त्यांना ऐकवलं होतं. त्यांच्यासारखा एवढा मोठा गायक माझी ओळख विसरला नव्हता.

ग्वाल्हेरला त्या वेळी तरी घरोघरी गाणं असे. शास्त्रीय संगीताचा पद्धतशीर अभ्यास केलेले अनेक गायक त्या वेळी ग्वाल्हेरात होते. पैसे देऊन गाणं करणं हा प्रकार फारसा नव्हता. चहाचा एक कप दिला की बस्स. रामभाऊंच्या ओळखीमुळे त्या महिनाभराच्या काळात मी अनेक ठिकाणी गायलो. रात्री ९ ते पहाटे २॥-३ अशा त्या बैठकी होत. अनेकजण गात. त्यांतच मीही गात असे. या अशा सगळ्या बैठकींमध्ये एक गोष्ट प्रकर्षानं जाणवे की, ग्वाल्हेरला अनेक विद्वान गानपंडित आहेत, पण गायक फारसे नाहीत.

## शास्त्रीय संगीताचा धबधबा

या ठिकाणी मला अभिप्रेत आहेत, ते रंजन करणारे गायक. गाणं शास्त्रीय असण्याबरोबरच ते गोड आणि स्वरेल असायला पाहिजे, ही माझी शास्त्रीय संगीताविषयीची कल्पना आहे. या कल्पनेत बसणारं गाणं मला त्या वेळी ग्वाल्हेरमध्ये कुठंच ऐकायला मिळालं नाही. त्यामुळे गंमत अशी व्हायची की, दहा-दहा, बारा-बारा वर्षं अव्याहत शिक्षण घेतलेले व गायनातली सर्वोच्च पदवी मिळविलेले काही विद्यार्थी गायल्यानंतर माझी गाण्याची पाळी आली की, मी वातावरण भारून टाकी. त्या सगळ्या विद्वानांच्या मानानं शिक्षणात मी फारच छोटा होतो. त्यांच्या तुलनेत माझी गाण्याची मेहनत नगण्य होती. पण एक गोष्ट अशी होती की, मी तंबोऱ्याच्या स्वरात लावलेला 'सा' पूर्णपणे सुरेल असे. त्यामुळे त्यांच्याइतकी माझी तयारी नसूनही माझं गाणं ऐकणाऱ्यांना आवडे. एकदोन ठिकाणी मी गायल्यावर मला साधारणत: रोजच रात्री कुठंना कुठं गायला बसावं लागे. जवळजवळ महिनाभर या गानविश्वात मी विद्यार्थ्याच्या भूमिकेतून पण कान आणि मन उघडं ठेवून विहार करत होतो. असा अनुभव यापूर्वी मला कधीच मिळालेला नव्हता. या महिनाभरात ऐकलेल्या गाण्यांमुळं 'शास्त्रात पूर्ण पारंगत होऊनसुद्धा गाणं कसं असावं अणि कसं नसावं', याचा उत्तम पाठ मला जाणून घेता आला.

शंकराचार्यांच्या पीठासारखंच ग्वाल्हेर हे गायनाचार्यांचं फार मोठं पीठ आहे. अनेक मोठेमोठे विद्वान, पंडित गवई या पीठामधून निर्माण झाले आहेत. या पीठाची परंपरा भारतभर पसरलेली आहे. शास्त्रीय संगीताचा प्रचंड धबधबा या ठिकाणी वाहात असलेला सतत महिनाभर मी अनुभवीत होतो. पण त्या धबधब्यामध्ये सौंदर्याचे छोटे-छोटेसुद्धा तुषार मला आढळले नाहीत. मी हा जो अनुभव सांगतोय, तो त्या महिनाभरात रात्रभर ज्यांची ज्यांची गाणी मी ऐकली, त्यांच्या विषयीचा आहे. त्यांतले बहुतेक सारे आठ-आठ, दहा-दहा वर्षं गाणं शिकत असलेले होते. काही तर सर्वोच्च परीक्षा देऊन पदवी घेतलेले होते.

गाणं गोड असावं की नाही, तसंच ते सौंदर्यपूर्ण असावं की नसावं, याविषयी

अनेकांच्या वेगवेगळ्या कल्पना असू शकतात, नव्हे आहेतही. सौंदर्य कशाला म्हणावं आणि त्याबरोबरच ते कुणाला कसं आणि कशात भासावं, हा प्रत्येकाच्या रुचीचा प्रश्न आहे. पण गाणं स्वरेल असावं, ही वादातीत गोष्ट आहे. आणि नेमका हाच स्वरेलपणा त्या विद्वान, अभ्यासू आणि शास्त्रपारंगत विद्यार्थी-गायकांत मला फारसा आढळून आला नाही.

पं. कृष्णराव पंडित किंवा राजाभय्या पूछवाले यांसारख्या महापंडित गायकांच्या संबंधी काही मत देण्याची माझी पात्रता नाही. त्यांच्यापुढं मी एक क्षुद्र माणूस आहे. पण त्यांच्याच तालमीत त्या वेळी तयार होत असलेल्या त्यांच्या शिष्यवर्गासंबंधी माझा अनुभव मात्र असा आहे. यालाही काही अपवाद असतील की, जे मला त्यावेळी ऐकायला मिळाले नसतील, त्यांनी मला क्षमा करावी.

ग्वाल्हेरच्या त्या मुक्कामात आणखी एक मजेदार अनुभव आला. रामभाऊंनी मोठ्या कौतुकानं माझं गाणं सरदार मुळ्यांना ऐकवायचं ठरवलं. गाणं रात्रीचं होतं. स्वत: रामभाऊ तबल्याची साथ करीत होते. एक ख्याल आणि जलद चीज झाल्यावर बर्फीचं ताट पुढं आलं. त्या साऱ्यांनी एक एक वडी घेतली. सरदारसाहेबांनी आग्रहानं आणखी एक वडी मला खायला लावली. दहा मिनिटांनी परत गाणं सुरू झालं. मी एक मध्य लयीची चीज आणि एक तराणा म्हणणार होतो. साधारणपणे अर्धाएक तास मी काय गात होतो, ते मला समजत होतं. पण नंतर काय झालं, कुणास ठाऊक! मी गात होतो आणि गातच होतो. मी नाटकातलं एक पद म्हटलं, एवढंच नव्हे तर शेवटी भैरवीही म्हटली म्हणे. रामभाऊ मला गायला सांगायचे आणि मी गायचा. हे सगळं रामभाऊंनीच मला नंतर सांगितलं. माझी पाठ थोपटून ते म्हणाले की, ''वा राम, तू छान गायलास.'' मला मात्र यातलं सरळ, स्पष्ट काही आठवत नाही. शेवटी दुसऱ्या दिवशी कळलं की, बर्फीत भांग घातली होती. भांगेचा हा प्रताप पहिल्यांदाच मला अनुभवायला मिळाला.

श्री. रामभाऊ गुळवणींनी त्या महिनाभरात मला काही चीजा ऐकवल्या. बालगंधर्वांची नाटकातली काही पदंही शिकवली. रामभाऊंचा आवाज गोड होता, स्वरेल होता, गाणंही मोठं ढंगदार होतं. त्यामुळे त्यांची मैफल चटकन जमे. त्यांच्याकडचा एक महिन्याचा मुक्काम मला अनेक दृष्टींनी लाभदायक झाला. शक्य त्यावेळी मी संघशाखेतही जात होतो. श्री. नारायणराव तरटे त्यावेळी तिथले संघाचे प्रचारक होते. त्यांच्याशी आणि इतर काही स्वयंसेवकांशी माझा पूर्वपरिचय होता.

**माझी उत्तरेतली भ्रमंती**

१९३७ आणि ३८ साली नागपूरला ओ.टी.सी.ला गेल्यामुळं हिंदुस्थानातल्या निरनिराळ्या प्रांतांतले स्वयंसेवक मला ओळखत होते. माझी आठवण त्यांना असण्याचं कारण एकच, ते म्हणजे मी गाणारा होतो. कँपमध्ये मी अनेकदा गाणी म्हणत असे. या ओळखींचा उपयोग मला माझ्या पुढच्या आयुष्यात अनेक ठिकाणी झाला.

ग्वाल्हेरला थंडी खूपच होती. नोव्हेंबर महिना होता. पुढं उत्तरोत्तर थंडी वाढत जाणार होती. पांघरण्यासाठी एका चादरीशिवाय माझ्याजवळ काहीच नव्हतं. म्हणून ग्वाल्हेरला सहा रुपये खर्च करून एक रजई मी विकत घेतली. या कापसाच्या रजईनंच उत्तरेतली थंडी सहन होऊ शकते. रामभाऊ गुळवणींच्याकडं खूप दिवस राहिलो. आता निघायला पाहिजे होतं. त्यांच्या चांगुलपणाचा जास्त फायदा घेणं इष्ट नव्हतं. त्यांनी 'पुढं कुठं जाणार', म्हणून विचारलं. मी त्यांना दिल्ली, लाहोर वगैरे बघून परत मुंबईला जाणार, असं सांगितलं. वास्तविक असं काही माझ्या मनात नव्हतं. पण त्यांना पटेल असं काहीतरी सांगायला हवं होतं.

ग्वाल्हेरच्या सर्व परिचितांचा निरोप घेतला. रामभाऊंनी अतिशय प्रेमानं माझ्या पाठीवरून हात फिरवला. मलाही खूप जड वाटत होतं. पण माझ्यासारख्या फिरस्त्याला एके ठिकाणी मुक्काम करून चालण्यासारखं नव्हतं.

ग्वाल्हेरहून झाशीला आलो. एक ओळख मिळाली होती. त्यांच्याकडं जाऊन टपकलो. दोनतीन दिवस झाशीत होतो. एक कार्यक्रमही झाला. तिथून आग्र्याला गेलो. आग्र्याच्या 'राजा की मंडी' स्टेशनजवळ 'महाराष्ट्र-समाज' आहे, तिथं उतरलो. त्या समाजाच्या माडीवरच एक कार्यक्रम समाजाच्या कार्यवाह–अध्यक्षांनी केला.

### मथुरेत श्रीकृष्णाचं दर्शन

आग्र्याहून मी मथुरेला आलो. मथुरेत माझा कार्यक्रम कुणी केला नाही. भगवान श्रीकृष्णाच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतलं. वृंदावनला जाऊन आलो. यमुना नदीवर स्नानाला म्हणून गेलो, पण त्या नदीतलं तिथलं पाणी पाहून अंघोळ न करताच परत आलो. दुसऱ्या दिवशी दिल्लीला आलो. जुन्या दिल्लीतल्या 'महाराष्ट्र समाजा'त उतरलो. त्या वेळी दिल्लीत एवढी एकच संस्था महाराष्ट्रीयांची होती. समाजाच्या हॉलमध्ये तीन दिवस फुकट राहायला मिळे. तळमजल्यावर महाराष्ट्रीय खाणावळही होती. तिथं जेवण चांगलं मिळे. थंडी भयंकर होती. अंघोळीस गरम पाणी मिळे, त्यासाठी चार आणे लागत.

मुंबई सोडल्यानंतर मालेगावपासून प्रत्येक गावी मला काही ना काही पैसे मिळत होते, पण दिल्लीत आणि त्या सगळ्याच भागात पुढं काय होईल, याची कल्पना नसल्यामुळे असलेले पैसे जपून खर्च करणं जरूर होतं. त्यामुळे अंघोळीच्या गरम पाण्यासाठी चार आणे खर्च न करता, मी दुपारी १२ च्या सुमारास नळाखाली जाऊन बसे. बारा वाजतासुद्धा इतकी थंडी असे की, पहिले काही क्षण पाणी अंगावर पडल्यावर ब्रह्मांड आठवे.

दिल्लीला आशाताई फडक्यांची भेट झाली. त्यांच्या प्रयत्नांमुळे श्री. साने यांच्या घरी माझा एक कार्यक्रम झाला. श्री. सान्यांची मुलगी यमुना गाणं शिकत होती. तिचे रेडिओवर कार्यक्रम होत असत.

देवासच्या राजवाड्यातल्या कार्यक्रमानंतर मी स्वत: पेटी वाजवून गायचा प्रयत्न करायला सुरुवात केली. कारण मला मिळणाऱ्या दोन-पाच रुपयांतले काही पैसे तबलेवाल्याला आणि पेटीवाल्याला दिल्यानंतर जवळ फारसं काही शिल्लक राहात नसे. इतक्या थोड्या पैशात साथीदारही चांगले मिळत नसत. त्या वेळेपर्यंत मला पेटी विशेषशी वाजवता येत नसे. पण हळूहळू तेही जमू लागलं. सगळ्याच ठिकाणी मला साथीदारांना पैसे द्यावे लागत नसत. कार्यक्रम ठरवणारेच त्यांची व्यवस्था करीत. पण

आता अगदी अनोळखी भागात गेल्यापासून या बाबतीत काळजी घेणं आवश्यक वाटू लागलं.

दिल्लीला त्या वेळी संघाची शाखा सुरू करण्यासाठी डॉ. हेडगेवारांनी श्री. वसंतराव ओकांना पाठवलं होतं. त्यांची भेट घेतली. त्यांच्याबरोबर श्री. कृष्णराव वडेकर होते. त्या दोघांचा परिचय १९३६ सालच्या पुण्याच्या संघ-शिक्षा वर्गापासून होता. नागपूरहून मुद्दाम शिक्षक म्हणून आलेल्या आठ कार्यकर्त्यांपैकी ते दोघं होते.

– कै. सुधीर फडके

(श्री. श्रीधर फडके यांच्या परवानगीने 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रातून क्रमशः)